# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक – ५९

## (सभावृत्तांत)

दिनांक – १८/०४/२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक १८/०४/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.आंगोळकर सागर सुनिल
३. मा.लोंढे नम्रता योगेश
४. मा.गीता सुशिल मंचरकर
५. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
६. मा.लांडगे सारिका संतोष
७. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
८. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
९. मा.बारणे अर्चना तानाजी
१०. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त, मा.गावडे-अतिरिक्त आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल, डॉ.साळवे-अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय संचालक, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.डोईफोडे,मा.दुरगुडे,मा.इंदलकर,मा.लोणकर, मा.बोदडे,मा.खोराटे, मा.खोत,मा.झगडे,मा.राऊत,मा.चितळे,मा.कापडणीस-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.निकम,मा.सवणे,मा.इंगळे,मा.तांबे, मा.चव्हाण, मा.खाबडे,मा.जुंधारे,मा.घोडे,मा.कांबळे,मा.ओंभासे,मा.गट्टूवार,मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.भोसले,मा. मोरे,मा.पाटील, मा.घुबे,मा.पवार-कार्यकारी अभियंता,मा.डॉ.दगडे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जगताप-कामगार कल्याण अधिकारी, मा.गावडे-अग्निशमन अधिकारी, मा.चारटणकर-सहव्यवस्थापकीय संचालक (पीएमपीएमएल) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक २५) मा.स्थायी समिती ठ.क्र.२४८३ दि.२१/३/२०१८ मध्ये दुरुस्ती करणेबाबत – मा.सारीका लांडगे, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २६) ॲनीमल किपर पदावर नियुक्त करणेबाबत – मा.अर्चना बारणे, मा.यशोदा बोईनवाड यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २७) महानगरपालिकेच्या पॅनेलवर सल्लागार नेमणुकीबाबत – मा.विकास डोळस, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २८) अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत...

विषय क्रमांक २९) मौजे पिंपरी वाघेरे येथील जागा भाडेतत्वावर देणेबाबत- मा.विकास डोळस, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३०) प्र.क्र.२७ रहाटणी येथील विकास विषयक कामांसाठी सल्लागार नेमणेबाबत – मा.साधना मळेकर, मा.प्रज्ञा खानोलकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३१) अखिल भारतीय स्वराज्य संस्था यांनी केलेल्या कामांची चौकशी करणेबाबत – मा.सागर आंगोळकर, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव...

--------

(पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मा.दिलिप गावडे (प्र.अतिरिक्त आयुक्त), मा.मंगेश चितळे (सहा.आयुक्त, अ प्रभाग) आणि मा.नितीन कापडणीस (सहा.आयुक्त, इ प्रभाग) यांचा मा.स्थायी समितीच्या वतीने मा.सभापती,स्थायी समिती यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.)

------------

अ) दिनांक ०४/०४/२०१८ व ११/०४/२०१८ रोजी दुपारी ०१.४५ वा. झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ५७) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ११/०४/२०१८ रोजी दुपारी ०२.०० वा. झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ५८) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक -२५५३ विषय क्रमांक - १

दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – ह क्षेत्रिय कार्यालय,विद्युत

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.हक्षे/वि/जा/३३/२०१८ दि.२/४/१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

माहे ऑगस्ट २०१७ पासुन माहे नोव्हेंबर २०१७ अखेर पर्यंत सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे विविध कार्यक्रमांकरीता तसेच क्रिडा स्पर्धेकरीता तात्पुरत्या स्वरुपात ध्वनीक्षेपन व प्रकाश

व्यवस्था करणेची कामे करून घेण्यात आलेली आहेत. सदर कामाचा खर्च र.रू.९,५८,६६४/- अदा करणे बाबत मे. त्रिमुर्ती मंडप स्पिकर एन्ड इलेक्ट्रीकल्स यांनी दि.२८/११/२०१७ चे पत्रानुसार कळविले आहे. सदरची कामे करुन घेणे आवश्यक असलेने ती करुन घेणेत आलेली आहेत व सदर कामाचा खर्च र.रु.९,५८,६६४/- (अक्षरी र.रू.नऊ लाख आठ्ठावण्ण हजार सहाशे चौसष्ठ फक्त) मंजुर दर ०.९% कमी दराने र.रु.९,५०,०३६/- मे.त्रिमुर्ती मंडप स्पिकर एन्ड इलेक्ट्रीकल्स यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५५४ विषय क्रमांक - २

दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – लेखा

सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/४२४६/२०१८ दि.५/४/२०१८

विषय - पीएमपीएमएल संचलनतूट व विविध प्रकारचे सवलतीचे पासेसपोटी दरमहा रक्कम अदा करावयाचे रक्कमेस मान्यता देणेबाबत...

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५५५ विषय क्रमांक - ३

दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – मुख्य लेखापरिक्षण

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ– मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/गट-६/कावि/७६/२०१८ दि.४/४/२०१८

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे डिसेंबर २०१७ अखेर संपणारा मासिक गोषवारा अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५५६ विषय क्रमांक - ४

दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – मुख्य लेखापरिक्षण

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ– मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/गट-६/कावि/७८/२०१८ दि.६/४/२०१८

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे फेब्रुवारी २०१८ अखेर संपणारा मासिक गोषवारा अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २५५७ विषय क्रमांक - ५

दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – मुख्य लेखापरिक्षण

सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ– मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/गट-६/कावि/७७/२०१८ दि.४/४/२०१८

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे जानेवारी २०१८ अखेर संपणारा मासिक गोषवारा अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २५५८ विषय क्रमांक - ६

दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – स्थापत्य EWS प्रकल्प

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/EWS प्र/२०७/१८ दि.७/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत गृहप्रकल्पांचे बांधकाम परवानगीकरिता पर्यावरण दाखला, Aviation NOC, M.P.C.B. Consents, Ground Water (CGWA NOC) व पर्यावरण संतुलन दर ६ महिन्यांचा रिपोर्ट या बाबी आवश्यक आहेत. या बाबींकरिता स्वतंत्र पर्यावरण सल्लागार यांची नेमणूक करुन त्यांचेमार्फत सदर कामे करणे आवश्यक आहे. कारण पर्यावरण दाखला मिळविणेकामी सल्लागार हे त्या क्षेत्रात अनुभवी व नाबेट या संस्थेचे सदस्य (NABET Accredited) आवश्यक असणे बंधनकारक असलेबाबत पर्यावरण विभागाची अट आहे. सदर कामांकरिता सल्लागार समिती (Panel) तयार करणेकामी निविदा नोटीस क्र.६/१-२०१७-१८ अन्वये दरपत्रक मागवून त्यातील कमीत कमी येणा-या दराने ती कामे करणेस तयार असणा-या सल्लागारांना या समितीमध्ये समाविष्ठ करणेत येत आहे. त्यानुसार सर्वात कमी आलेले दर पुढील प्रमाणे :

१) ५००० ते २०००० चौ.मी. करिता र.रु.५,२५,०००/- प्रति प्रकल्प.

२) २०००० ते ५०००० चौ.मी. करिता र.रु.६,२०,०००/- प्रति प्रकल्प.

३) ५०००० ते १५०००० चौ.मी. करिता र.रु.७,३५,०००/- प्रति प्रकल्प.

त्यानुसार मे.एस.जी.एम.एनव्हायरो (इं) प्रा.लि. व मंत्रास ग्रीन रिसो लि. यांना पर्यावरण सल्लागार पॅनेलवर घेण्यास व उपरोक्त मंजूर दराने कामे करुन घेणेस तसेच सदर मंजूर दराने काम करणेस तयार असलेल्या व नाबेट सदस्यत्व असणा-या सल्लागारांना या Panel मध्ये समाविष्ठ करुन घेण्यास मा.स्थायी समिती ठराव क्र.२०७५, दि.२४/०१/२०१८ अन्वये मान्यता मिळालेली आहे.M/s.VK:e environmental LLP यांनी दि.२१/०३/२०१८ चे पत्रान्वये मा.स्थायी समितीच्या मंजूर दराप्रमाणे काम करणेस सहमती दर्शविली आहे व ते नाबेट या संस्थेचे सदस्य (NABET Accredited) असून त्याबाबत कागदपत्रे सादर केली आहेत. सबब, M/s.VK:e environmental LLP या सल्लागार संस्थेस पर्यावरण सल्लागार पॅनेल वर घेणेस व उपरोक्त मंजूर दराप्रमाणे काम करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ०९ प्रतिकूल - ०१

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

ठराव क्रमांक -२५५९ विषय क्रमांक - ७

दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१२८८/२०१८ दि.७/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.२४/१/२०१७-१८ अन्वये Request for Proposal (RFP) for Selection of Project Management Consultancy for Implementation of Continuous (24X7) Pressurized Water Supply System in 60% area of Pimpri - Chinchwad Municipal Corporation या कामासाठी मे.डी.आर.ए. कन्सल्टंट प्रा. लि. यांची PART 1 (Survey + Design) व PART 2 (Project Management Consultancy ) साठी र.रु.१२,९७,३१,०००/- (अक्षरी र.रू. बारा कोटी सत्त्यान्नव लाख एकतीस हजार फक्त) व PART 3 (मनपासाठी ऐच्छिक) र.रु.८,९१,००,०००/- दराने काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील तसेच या व्यतिरिक्त कामास लागू होणारे कर, म.न.पा. मार्फत प्रचलित दरानुसार अदा करण्यात येतील या अटीस अधिन राहून त्यांच्याबरोबर करारनामा करुन घेणेस व प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी प्रस्तुत विषयातील PART 1 (Survey + Design) व PART 2 (Project Management Consultancy) या करीता करारनामा करणेस व येणा-या र.रु.१२,९७,३१,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच PART 3 साठीचे दर व रक्कम वगळण्यास आणि PART 2 चे काम संपलेनंतर PART 3 साठीचे दर, करारनामा व खर्चास मान्यतेबाबतचा प्रस्ताव अलाहिदा स्वतंत्रपणे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५६० विषय क्रमांक - ८

दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – अग्निशामक

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ– मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.अग्नि/२/कावि/३८३/२०१८ दि.६/४/२०१८

विभाग - अग्निशामक दलातील वाहने व उपकरणे दुरुस्तीसाठी मानधनावर तांत्रीक फिटर कर्मचारी नेमणेबाबत...

विषय क्रमांक ८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५६१ विषय क्रमांक - ९

दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/११/कावि/३६७/२०१८ दि.१०/४/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

निविदा सूचना क्रमांक १७/२०१७-१८ नुसार लघुत्तम निविदाधारक मे.टेक ९ सर्व्हिसेस यांना पुढील एक वर्षा करीता पिंपरी चिंचवड मनपाची वेबसाईट होस्टींग करणेचे कामकाज देण्यास तसेच त्यांचेसोबत कामाचा करारनामा करण्यास व त्यासाठी येणा-या र.रू.१७,१७,२००/- (अक्षरी र.रू.सतरा लाख सतरा हजार दोनशे फक्त) (सर्व करांसहीत) अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.९८% ने कमी चे दरास व त्या अनुशंगाने येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५६२ विषय क्रमांक - १०

दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/१६/१०८४/२०१८ दि.१०/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मौजे बो-हाडेवाडी येथील मंजूर विकास योजनेतील रस्ते व आरक्षणे विकसित करणेसाठी आवश्यक त्या ठिकाणी भूसंपादन करणेबाबत मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.२४ दि.०५।१०।२०१७ तसेच मा.महापालिका सभा.ठराव क्र.९१ दि.१६।१०।२०१७ अन्वये मा.सदस्य ठराव करणेत आलेले आहे. सदर ठरावांची अंमलबजावणी करणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. प्रस्तावात नमूद प्रमाणे मौजे बो-हाडेवाडी येथील मंजूर विकास योजनेतील रस्ते व आरक्षणे विकसित करणे सदर गावचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने आवश्यक असुन त्यासाठी भूसंपादन करावे लागणार आहे. तसेच सदर रस्ते व आरक्षणे मनपाच्या ताब्यात भुसंपादनाने घेणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक असुन (त्यामध्ये भूसंपादन विशेष अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाई रक्कम) तसेच त्यासाठी आवश्यक ते सर्वेक्षण, मोजणी करणे इ. अनुषंगिक मंजूरीसह येणा-या सर्व खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५६३ विषय क्रमांक - ११

दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ– मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/१७९/२०१८ दि.१०/४/२०१८

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या एक्स रे विभागातील केअर स्ट्रीम कंपनीच्या डी.आर.सिस्टीम करिता आवश्यक ४ बॅट-या खरेदी करणेकामी संबंधित उत्पादित कंपनी मे.केअरस्ट्रीम हेल्थ इंडिया प्रा.लि.,मुंबई यांनी सादर केलेले र.रु.४०,५००/- प्रती नग (अक्षरी र.रू. चाळीस हजार पाचशे फक्त) (सर्व करांसह) चे दरपत्रक स्विकृत करणेत आलेले असुन ४ बॅट-यांचा पुरवठा करणेकामी उत्पादित कंपनी मे.केअर स्ट्रीम हेल्थ इंडिया प्रा.लि.,मुंबई यांना पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. सबब निविदा न मागविता, करारनामा न करता, थेट पध्दतीने बॅट-या खरेदी करणेकामी निर्गत करणेत आलेल्या आदेशाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५६४ विषय क्रमांक - १२

दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – मुख्यलेखापरिक्षण

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ– मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/४००/२०१८ दि.११/४/२०१८

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५६५ विषय क्रमांक - १३

दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – मुख्यलेखापरिक्षण

सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ– मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/८०/२०१८ दि.११/४/२०१८

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१२/०३/२०१८ ते दि.१८/०३/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/८०/२०१८ दि.११/०४/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५६६ विषय क्रमांक - १४
दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ– मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/८१/२०१८ दि.११/४/२०१८

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१९/०३/२०१८ ते दि.२५/०३/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/८१/२०१८ दि.११/०४/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५६७ विषय क्रमांक - १५
दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – बी.आर.टी.एस.
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बीआरटीएस/४८/२०१८ दि.११/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी ते निगडी (भक्ती शक्ती चौक) व नाशिक फाटा ते चाकण (मोशी मार्गे) या मार्गांवर मेट्रो सुरु करण्याबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करणेबाबत तसेच नाशिक फाटा ते खेड या राष्ट्रीय महामार्गाचे (NH-4) कामामध्ये मेट्रोसाठीची जागा ठेवुन काम करणेबाबत मा.आमदार, मा.खासदार व मनपाचे पदाधिकारी यांनी मागणी केली आहे. पिंपरी चिंचवड मनपातील विविध प्रश्नांबाबत दि.०२/०१/२०१७ रोजी मा.आयुक्त यांचे कार्यालयात मा.आमदार व मनपाचे पदाधिकारी यांची बैठक घेणेत आली असुन सदर बैठकीस महाराष्ट्र मेट्रोरेल कार्पोरेशन लि. (MMRCL) व भारतीय राष्ट्रीय राज मार्ग प्राधिकरण (NHAI) यांचे कार्यालयाकडील अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये पिंपरी ते निगडी व नाशिक फाटा ते चाकण (भोसरी-मोशी मार्गे) मेट्रो मार्ग वाढविणेबाबत चर्चा करण्यात येऊन सदर मार्गाचा डि.पी.आर तयार करणे बाबत महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांना सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत पत्र क्र.सिव्हील/बीआरटीएस/१०२३/२०१८, दि.०१/०१/२०१८ अन्वये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांना पिंपरी ते निगडी व नाशिक फाटा ते चाकण (मोशी मार्गे) या मेट्रो मार्गांचा डी.पी.आर तयार करणे बाबत व त्यासाठी येणारा खर्च पिपंरी चिंचवड महानगरपालिका देणार असल्या बाबत कळविणेत आले होते. कार्यकारी संचालक, महा मेट्रो यांनी त्यांचे पत्र क्र.MAHAMETRO PUNE/KP/PLNG/505,दि.१९/०३/२०१८ चे पत्रान्वये पुणे मेट्रो रेल प्रकल्प भाग-२ साठी DPR तयार करणेकामी SYSTRA-AECOM-EGIS-RITES (Consortium) यांची दि.३१/०१/२०१८ पासुन सेवा घेणेत येत असुन DPR तयार करणेकामी ८ महिन्यांचा कालावधी लागणार असले बाबत कळविले आहे तसेच विषयांकित पिंपरी ते निगडी (भक्ती शक्ती चौक) व नाशिक फाटा ते चाकण (मोशी मार्गे) या मार्गांवर मेट्रो सुरु

करणेबाबत मेट्रो मार्गाचे DPR तयार करणे साठी र.रु.३८४.७२ लाख रु. + १२ % GST एवढा खर्च अपेक्षित असले बाबत नमुद केले आहे. तसेच सदर खर्चाची र.रु.३८४.७२ लाख + १२ % GST एवढी रक्कम महा मेट्रो कडे वर्ग करणेबाबत कळविले आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता, विषयंकित पिंपरी ते निगडी (भक्ती शक्ती चौक) व नाशिक फाटा ते चाकण (मोशी मार्गे) या मार्गांवर मेट्रो सुरु करणेबाबत मेट्रो मार्गाचे DPR तयार करणेकामी महा मेट्रो यांना र.रु.३४८.७२ लाख + १२ % GST एवढी रक्कम अदा करावी लागणार आहे. सदरची रक्कम मनपाचे सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकातील केंद्र शासन पुरस्कृत योजना व युटीएफ लेखाशिर्ष पान क्र.५०६ अ.क्र.४ चा मुळ अंदाज र.रु.५०.०० कोटी तरतुदी मधुन देता येईल. सदर रक्कम अदा करणेकामी मा.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी विषयपत्र तयार करणेत आलेले आहे.सबब, विषयांकित पिंपरी ते निगडी (भक्ती शक्ती चौक) व नाशिक फाटा ते चाकण (मोशी मार्गे) या मार्गांवर मेट्रो सुरु करणेबाबत DPR करणेकामी महामेट्रो यांना र.रु.३४८.७२ लाख + १२% GST एवढी रक्कम थेट पद्धतीने करारनामा न करता महाराष्ट्र महापालिका अधिनियम ५(२)(२) नुसार फॉर्म नं.२२ अन्वये अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५६८ विषय क्रमांक - १६

दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ– मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र. YCMH/भांडार/२/कावि/१८४/२०१८ दि.१२/४/२०१८

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या डायलिसीस विभागाने त्यांचेकडील निप्रो कंपनीच्या डायलिसीस मशीन Sr.No.13G8306E च्या दुरुस्तीची मागणी केलेनुसार संबंधित मशीनच्या दुरुस्तीसाठी आवश्यक स्पेअर पार्टचे एकूण र.रु.२,५६,३७९/-(अक्षरी र.रू. दोन लाख छप्पन्न हजार तीनशे एकोणऐंशी फक्त) चे दरपत्रक संबंधित उत्पादित कंपनी मे.निप्रो मेडीकल इंडिया प्रा.लि., मुंबई यांनी सादर केले होते. सदरचे दरपत्रक स्विकृत करणेत आलेले असुन त्यांना पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. सबब निविदा न मागवता, करारनामा न करता, थेट पध्दतीने उत्पादित कंपनीकडून आवश्यक स्पेअर पार्ट खरेदी करणेकामी निर्गत करणेत आलेल्या आदेशाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५६९ विषय क्रमांक - १७

दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र. मभां/८/कावि/५९५/२०१८ दि.११/४/२०१८

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे विविध विभागासाठी आवश्यक छपाई साहित्य मनपा नमुन्या प्रमाणे छपाई करुन पुरवठा करणेकामी ई.नि.सु.क्र.34/2017-18 अन्वये लघुत्तम कोटेशनधारक १) मे.अमृत मुद्रणालय यांचे कडील बाब क्रं.1 ते 11, 13 ते 25, 28 ते 37 एकुण 34 बाबी छपाईकामी एकुण र.रु.8,10,925/- २) मे.व्हि.एम.शिंदे यांचे कडील बाब क्रं.38,39 एकुण 2 बाबी छपाईकामी एकुण र.रु.9,170/- ३) मे डी.एन.एम प्रिंटींग हाऊस यांचे कडील बाब क्रं.12, 26 व 27 एकुण 3 बाबी छपाईकामी एकुण र.रु.7,975/- असे एकुण र.रु.8,28,070/- (अक्षरी र.रु.आठ लाख अठ्ठावीस हजार सत्तर फक्त) इतके दर लघुत्तम प्राप्त असुन सदरचे दर स्विकृत करणेत आले आहेत. त्यानुसार तिनही निविदाधारकांना दिनांक 02/04/2018 अन्वये विविध विभागासाठी आवश्यक छपाई साहित्य पुरविणेकामी पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. सदर झालेल्या खर्च एकुण र.रु.8,28,070/- (अक्षरी र.रु.आठ लाख अठ्ठावीस हजार सत्तर फक्त) चे खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५७० विषय क्रमांक - १८

दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – नागरवस्ती विकास योजना

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ– मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.नाविया/३/कावि/१०१/२०१८ दि.१३/४/२०१८

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध योजना राबविल्या जातात. महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत मा.महापालिका सभा ठराव क्रं.४५७ दि.२०/१/२०१४ अन्वये मंजूर धोरणानूसार " इ.१० वी. मध्ये शिकत असणा-या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य घेणेकामी अर्थसहाय्य देणे या योजनेसाठी प्रति लाभार्थी रक्कम रु.३,०००/- या प्रमाणे लाभ देणेत येत होता. तथापि मा.महिला बाल कल्याण समिती ठराव क्र.६ दि.०६/०६/२०१७ अन्वये तसेच मा.आयुक्त सो यांचेकडील मंजूर आदेश क्र.नाविया/२/कावि/२२०/२०१७ दि.३१/०८/२०१७ अन्वये या योजने करीता प्रति लाभार्थी रक्कम रु.६,०००/- इतका लाभ देणेस मान्यता आहे. त्याप्रमाणे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात जाहीर प्रकटनाद्वारे अर्ज मागविणेत आले असता एकुण २९२ अर्ज मुदतीमध्ये प्राप्त झाले आहेत. तसेच सन्मा. नगरसदस्य तसेच संबंधित शाळेमधील मुख्याध्यापक यांचे विनंती नुसार प्राप्त झालेले एकुण १९५ अर्ज स्विकृत करुन सदर मुदती मधील व मुदती नंतरचे असे प्राप्त एकुण

४८७ अर्जाची सदर योजनेच्या अटी शर्ती नुसार तपासणी केली असता, २४७ अर्ज पात्र झालेले असून २४० अर्ज अपात्र झाले आहेत. सदर पात्र २४७ लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी रक्कम ६,०००/- या प्रमाणे रक्कम रु.१४,८२,०००/- इतका लाभ आदेश क्र.नावियो/३/कावि/५१/१८ दि.२०/०३/२०१८ अन्वये इसीएसद्वारे अदा करणेत आला आहे. सबब, पात्र लाभार्थींना शैक्षणिक साहित्य खरेदी करणेकामी अर्थसहाय्य अदा करणेकरिता झालेल्या र.रू.१४,८२,०००/- (अक्षरी र.रू.चौदा लाख ब्याऐंशी हजार फक्त) चे खर्चास तसेच या नंतर दि.३१ ऑगस्ट २०१८ पर्यंत अपात्रतेची पुर्तता करून पात्र ठरणा-या लाभार्थींना प्रति लाभार्थी र.रू.६,०००/- या प्रमाणे अर्थ सहाय्य देणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५७१ विषय क्रमांक - १९
दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/१६४/१८ दि.१३/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.73-20-2017-2018 अन्वये प्रभाग क्र.१३ निगडी गावठाण येथील सेक्टर क्र.२२ मधील स्मशानभुमी समोरील ओटा स्कीम क्र.१ ते ६ च्या अंतर्गत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी एस.एम.कन्स्ट्रक्शन नि.र.रू.46,20,666/- (अक्षरी रक्कम रुपये सेहृचाळीस लाख वीस हजार सहाशे सहासष्ठ फक्त) पेक्षा 15.89% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.38,86,442/- पर्यंत काम करून घेणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५७२ विषय क्रमांक - २०
दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/७३३/१८ दि.१३/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४६/१७/२०१७-१८ प्रभाग क्र.१७ मध्ये नविन पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी M/s.PRISM ENTERPRISES नि.र.रू.३६,४१,४४२/- (अक्षरी र.रू. छत्तीस लाख एकेचाळीस हजार चारशे बेचाळीस फक्त) पेक्षा १०.५०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.३२,५९,०९१/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -२५७३ विषय क्रमांक - २१
दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/७३४/१८ दि.१३/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४६/११/२०१७-१८ प्रभाग क्र.१७ मध्ये पेव्हींग ब्लॉक, गटर्स, रस्ते दुभाजक, फुटपाथ व मनपा इमारतींची किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी M/s.PRISM ENTERPRISES नि.र.रू.४६,२०,४६१/-(अक्षरी र.रू.सेहचाळीस लाख वीस हजार चारशे एकसष्ट फक्त) पेक्षा १०.५०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.४१,३५,३१३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५७४ विषय क्रमांक - २२
दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – जलनि:सारण
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जनि/२/कावि/९९८/१८ दि.१३/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.30/6/2017-2018 अन्वये कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत बालाजीनगर झोपडपट्टी व उर्वरित ठिकाणी मलनि:स्सारण नलिका टाकणेकामी M/S SANKALP INFRASTRUCTURE यांनी नि.र.रू.1,94,99,966/- (अक्षरी र.रू.एक कोटी चौ-यांण्णव लाख नव्याण्णव हजार नऊशे सहासष्ठ फक्त) पेक्षा 28.41% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने रक्कम रूपये 1,39,60,026/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५७५ | विषय क्रमांक - २३
दिनांक – १८/०४/२०१८ | विभाग–अ क्षेत्रिय कार्यालय,जलनिःसारण
सूचक – मा.यशोदा बोईनवाड | अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अक्षेका/जनि/कावि/६३/२०१८ दि.१३/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाचे अ प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदार पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणेचे काम मे.आर्यन पंप्स ऍन्ड एन्व्हायरो सोल्युशन प्रा. लि. हे करीत आहेत. सदर कामाचे निविदा अटी शर्ती (A) मधील अट क्र.४ नुसार सदर निविदेचा कालावधी ५ वर्षांचा असुन सुरुवातीस कामाचा आदेश १ वर्षासाठी द्यावयाचा आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेवून पुढील प्रत्येक वर्षासाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देणेत येईल या प्रमाणे अटी व शर्ती मध्ये नमुद करणेत आलेले आहे. त्यानुसार सदरच्या निविदेस मा. स्थायी समितीचे ठराव क्र.१३९९१, दि.०८/१२/२०१५ अन्वये मंजूरी मिळाली आहे. मा.स्थायी समिती ठराव नुसार सदर कामाचे निविदा रक्कम रूपये १,०५,३९,९००/- साठी ३.२२% कमी या दराने म्हणजेच रक्कम रूपये १,०२,००,५१५/- पर्यंत काम करून घेणेस तसेच सुरूवातीस एक वर्ष कालावधीसाठी येणा-या खर्चास मान्यता मिळाली आहे. ठेकेदार मे.आर्यन पंप्स ऍन्ड एन्व्हायरो सोल्युशन प्रा. लि. यांनी सदरचे काम समाधानकारक रित्या पुर्ण केले असल्याने मा. स्थायी समितीने सदर कामास पुढील ५ पैकी दुस-या वर्षाकरीता ठराव क्र.१९४७७, दि.२३/१२/२०१६ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर कामातील मुळ निविदा शर्थ व अट क्र.४ नुसार ५ वर्षापैकी पहिल्या दोन वर्षाची मुदत पुर्ण होत असल्याने पुढील १ वर्ष (तृतीय वर्ष) कालावधीसाठी येणा-या खर्चास व निविदा अटी व शर्ती (A) मधील अट क्र.४ नुसार निविदा दरात १०% वाढ करून पुढील तृतीय वर्षाकरीता मुदतवाढ देणेस मा. स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे. सद्यस्थितीत चालू असलेले डिझेल व लेबरचे दर तसेच सदर कामाची निविदा भरले त्यावेळचे दर यांची तुलना केली असता प्रपत्र ब प्रमाणे निविदा स्विकृती योग्य दर १४.९०% इतका जास्त येत आहे. सदरचा वाढीव दर १४.९०% पाहता निविदा अटी व शर्ती प्रमाणे ठेकेदार यांना १०% दरवाढ देवून पुढील १ वर्षास मुदतवाढ देणेस हरकत वाटत नाही. त्यानुसार पुढील एक वर्ष कालावधीसाठी ठेकेदार यांना १०% दरवाढ देऊन येणारा खर्च र.रू.१,१५,९३,८९०/- पर्यंत काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५७६ विषय क्रमांक - २४

दिनांक – १८/०४/२०१८ विभाग – इ क्षेत्रिय कार्यालय,जलनिःसारण

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.इक्षेका/जनि/कावि/२/९९९/२०१८ दि.१३/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाचे इ प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदार पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणेचे काम मे. आर्यन पंप्स ऍन्ड एन्व्हायरो सोल्युशन प्रा. लि. हे करीत आहेत. सदर कामाचे निविदा अटी शर्ती (A) मधील अट क्र.४ नुसार सदर निविदेचा कालावधी ५ वर्षांचा असुन सुरुवातीस कामाचा आदेश १ वर्षासाठी द्यावयाचा आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेवून पुढील प्रत्येक वर्षासाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देणेत येईल या प्रमाणे अटी व शर्ती मध्ये नमुद करणेत आलेले आहे. त्यानुसार सदरच्या निविदेस मा.स्थायी समितीचे ठराव क्र.१३९९०, दि.०८/१२/२०१५ अन्वये मंजूरी मिळाली आहे. मा. स्थायी समिती ठराव नुसार सदर कामाचे निविदा रक्कम रूपये १,०५,५०,२६८/- साठी १% कमी या दराने म्हणजेच रक्कम रूपये १,०४,४४,७६५/- पर्यंत काम करून घेणेस तसेच सुरूवातीस एक वर्ष कालावधीसाठी येणा-या खर्चास मान्यता मिळाली आहे. ठेकेदार मे. आर्यन पंप्स ऍन्ड एन्व्हायरो सोल्युशन प्रा. लि. यांनी सदरचे काम समाधानकारक रित्या पुर्ण केले असल्याने मा. स्थायी समितीने सदर कामास पुढील ५ पैकी दुस-या वर्षाकरीता ठराव क्र.१९४७६, दि.२३/१२/२०१६ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर कामातील मुळ निविदा शर्थ व अट क्र.४ नुसार ५ वर्षापैकी पहिल्या दोन वर्षाची मुदत पुर्ण होत असल्याने पुढील १ वर्ष (तृतीय वर्ष) कालावधीसाठी येणा-या खर्चास व निविदा अटी व शर्ती (A) मधील अट क्र.४ नुसार निविदा दरात १०% वाढ करून पुढील तृतीय वर्षाकरीता मा. स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे. सद्यस्थितीत चालू असलेले डिझेल व लेबरचे दर तसेच सदर कामाची निविदा भरले त्यावेळचे दर यांची तुलना केली असता प्रपत्र ब प्रमाणे निविदा स्विकृती योग्य दर १४.९०% इतका जास्त येत आहे. सदरचा वाढीव दर १४.९०% पाहता निविदा अटी व शर्ती प्रमाणे ठेकेदार यांना १०% दरवाढ देणेस हरकत वाटत नाही. त्यानुसार पुढील एक वर्ष कालावधीसाठी ठेकेदार यांना १०% दरवाढ देऊन येणारा खर्च र.रू.१,१६,०५,२९५/- पर्यंत काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक -२५७७ विषय क्रमांक - २५
दिनांक – १८/०४/२०१८
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ– मा.सारिका लांडगे, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.२४८३, दि.२१/३/२०१८ अन्वये महापौर चषक राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा २०१७-१८ या माहे फेब्रुवारी/मार्च २०१८ या कालावधीत राजर्षी शाहू महाराज क्रीडांगण शाहुनगर, चिंचवड १९ येथे आयोजित करणेत आले आहे. सदर ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर स्पर्धा कै.सदाशिव बहिरवाडे क्रिडांगण, शाहुनगर या ठिकाणी आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५७८ विषय क्रमांक - २६
दिनांक – १८/०४/२०१८
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ– मा.अर्चना बारणे, मा.यशोदा बोईनवाड यांचा प्रस्ताव...

श्री.राजेश मधुकर कांबळे व श्री.योगेश श्रीकृष्ण कांजवणे यांना ॲनीमल किपर या पदावर ६ महिने कालावधीसाठी नियुक्त करणेस तसेच त्यांना कामगार कल्याण विभागाकडील अभिप्रायानुसार मानधन अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५७९ विषय क्रमांक - २७
दिनांक – १८/०४/२०१८
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ– मा.विकास डोळस, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विषयक विविध कामकाजासाठी मे.एस.एस. कन्सल्टंसी सर्व्हीसेस,धायरी यांना महानगरपालिकेच्या पॅनेलवर सल्लागार म्हणून नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५८०

विषय क्रमांक - २८

दिनांक – १८/०४/२०१८

विभाग - उद्यान

सूचक – मा.अर्चना बारणे

अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/२१४/२०१८ दि.१६/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.वृक्षप्राधिकरण समिती सदस्य व मनपा कर्मचारी यांना दि.३/५/२०१८ ते दि.८/५/२०१८ अखेर सिक्कीम अभ्यास दौ-यावर युनिव्हर्सल टूरीझम यांचे मार्फत जाणेस व त्याकामी येणा-या र.रु.९,५३,०००/- चे खर्चास व दौ-यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५८१

विषय क्रमांक - २९

दिनांक – १८/०४/२०१८

विभाग - उद्यान

सूचक – मा.विकास डोळस

अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.विकास डोळस, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव...

मौजे पिंपरी वाघिरे येथील स.नं.२०२ येथील (१०००० चौ.मी.) जागा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. सदर जागेतील १०० चौ.मी. जागा मे.ओम साई फाऊंडेशन या संस्थेस पार्कींगसाठी नियमानुसार योग्य त्या भाडे दराने ११ महिने कालावधीसाठी देणेसाठी भुमि आणि जिंदगी विभागाकडील अभिप्रायानुसार वापरणेस देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५८२

विषय क्रमांक - ३०

दिनांक – १८/०४/२०१८

सूचक – मा.साधना मळेकर

अनुमोदक – मा.प्रज्ञा खानोलकर

संदर्भ– मा.साधना मळेकर, मा.प्रज्ञा खानोलकर यांचा प्रस्ताव...

ग क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.२७ रहाटणी (जुना प्रभाग क्र.४८) येथील खालील नमूद केलेले विकास विषयक काम नियोजनबद्ध रित्या करणेसाठी महानगरपालिकेच्या पॅनलवरील सल्लागार मे.इन्फिनिटी कन्सल्टंट इंजिनिअर्स यांची नेमणूक करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | प्रभाग क्र,४८ येथील विमल गार्डन ते नढेनगर पर्यंतच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण करणे. |

तरी वरील नमुद केलेल्या विकास कामाच्या निविदा पुर्व व निविदा पश्चात बाबींकरीता मे.इन्फिनिटी कन्सल्टंट इंजिनिअर्स यांची नेमणुक करणेस व मनपाच्या प्रचलित दरानुसार सल्लागार फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -२५८३ विषय क्रमांक - ३१

दिनांक – १८/०४/२०१८

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ– मा.सागर आंगोळकर, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव...

नागरवस्ती विकास योजना मार्फत महिलांना विविध प्रशिक्षण तसेच महिला कौशल्या वाढ विकास प्रशिक्षण देण्याचे काम मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था या संस्थेस गेल्या ५ ते १० वर्षांपासून देण्यात येत आहे. याबाबत अधिक माहिती घेतली असता या प्रशिक्षणामधून महिलांचे सक्षमीकरण झाल्याचे दिसून येत नाही. तसेच सदर संस्थेचे काम केवळ कागदोपत्री झाल्याचे दिसून येत आहे. प्रत्यक्षात महिलांना प्रशिक्षण दिल्याचे काम केल्याचे दिसत नाही. त्यामुळे सदर संस्थेची कार्यपद्धती संशयास्पद वाटते तरी सदर संस्थेने आत्तापर्यंत केलेल्या सर्व कामांची चौकशी करणेसाठी स्वतंत्र चौकशी समिती नेमुन सखोल चौकशी करण्यास व चौकशीचा अहवाल मा.स्थायी समिती पुढे सादर करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/७/कावि/१५७/२०१८
दिनांक - १९/०४/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.हक्षे/वि/जा/३३/२०१८ दि.०२/०४/२०१८ विषय क्र.१ चे लगत)

PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION,
PIMPRI - 411018.

(e)

**Name of work :-- Providing Temporary P.A system & illumination for Various programme in `H` zone areas**

| | | | | | items | metal halide | halogen | Scaffolding | Series Light | generator 3to10kva | pa system VVIP | pa system | pa system vip | LED screen |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| sr no | Name of work | Place of work | Date | days | rates | 194 | 177 | 6000 | 943 | 4293 | 23000 | 2500 | 7500 | 250 |
| 1 | Indepence Day | H Zone | 15-08-17 | 1 | | | | | 2 | | | | 1 | |
| 2 | Tanaji Malusare Vardhapan Din | Dapodi | 19-08-17 | 1 | | 2 | 2 | | 2 | 1 | | | 1 | |
| 3 | Ahilyabai Holkar Punyatithi | Sanghavi | 20-08-17 | 1 | | | | | | 1 | | | 1 | |
| 4 | Hand ball | H.A school pimpri | 26/08/2017 to 31/08/2017 | 6 | | | | | | 5.5 | | | 6 | |
| 5 | Talvarbaji | Kasarwadi prathimik school | 28/08/2017 to 29/08/2017 | 2 | | | | | | 1.9 | | | 2 | |
| 6 | Nehru cup hockey | Polygrass hockey stadium | 29/08/2017 to 31/08/2017 | 3 | | | | | | 2.8 | | | 3 | |
| 7 | Shalaya hockey | Polygrass hockey stadium | 01/09/2017 to 06/09/2017 | 6 | | | | | | 5.5 | | | 6 | |
| 8 | Ganesh Festival Meeting | Acharya atre | 02-09-17 | 1 | | | | | | | 1 | | | 192 |
| 9 | H Zone Meeting | H Zone Meeting | 07-09-17 | 1 | | | | | | | | | 1 | |
| 10 | Engineering Day | Magar Stadium | 13/09 to 14/09/2017 | 2 | | | | | | | 2 | | | |
| 11 | Yogasan | Din Dayal Madhamik Vidhyalaya | 16/09/2017 to 17/09/2017 | 2 | | | | | | 1.9 | | | 2 | |
| 12 | Engineering Day | Phule auditorium pimple gurav | 15-09-17 | 1 | | | 10 | | | | | | | 448 |
| 13 | Soft ball | Dr Babasaheb Ambedkar Krida sankul sant tukaram nagar | 22/09/2017 to 25/09/2017 | 4 | | | | | | 3.7 | | | 4 | |
| 14 | Kabaddi | Kasarwadi prathimik school | 22/09/2017 to 29/09/2017 | 8 | | | | | | 7.3 | | | 8 | |
| 15 | Swach Bharat Abhiyan | H Zone | 25/09/2017 to 30/09/2017 | 6 | | | | | | | | 6 | | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 16 | Baseball | Dr Babasaheb Ambedkar Krida sankul sant tukaram nagar | 26/09/2017 to 29/09/2017 | 4 | | | | | | 3.7 | | | 4 | |
| 17 | Bhagat singh | Dapodi | 28-09-17 | 1 | | | | | | 1 | | | 1 | |
| 18 | H Zone Meeting | H Zone meeting | 05-10-17 | 1 | | | | | | | | | 1 | |
| 19 | Valmiki Jayanti | YCMH | 05-10-17 | 1 | | | | | | | | | 1 | |
| 20 | Phule auditorium mohastav | Phule auditorium pimple gurav | 13/10 to 15/10/2017 | 3 | | | | | | | | | | 720 |
| 21 | Chhat pooja | Bombay colony | 25/10/2017 to 27/10/2017 | 3 | | 3 | 4 | | | | | | | |
| 22 | Chhat pooja | kasarwadi ghat | 25/10/2017 to 27/10/2017 | 3 | | | 4 | | | | | | | |
| 23 | YCMH Doctor recruitment Interview | YCMH | 6/11 & 7/11/2017 | 2 | | | | | | | 2 | | | |
| 24 | Vasant dada Patil Jayanti | Sanghavi Bus stop | 13-11-17 | 1 | | | | | | 1 | | | 1 | |
| 25 | Yeshwant Chavan Jayanti | Vallabhnagar st stand | 25-11-17 | 1 | | | | | | 1 | | | 1 | |
| 26 | Yeshwant Chavan Jayanti | YCMH | 25-11-17 | 1 | | | | | | | | | 1 | |
| 27 | Bhai Kotwal Jayanti | Phugewadi | 01-12-17 | 1 | | | | | | | | | 1 | |
| 28 | Parinirvan Din | Dapodi ambedkar statue | 06-12-17 | 1 | | | | | | 1 | | | 1 | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | Total Qty | | | 5 | 20 | 0 | 4 | 38.3 | 5 | 6 | 47 | 1360 |

Junior Engg ( Elec )
H Ward PCMC

Deputy Engg ( Elec )
H Ward PCMC

Executive Engg ( Elec )
H Ward PCMC

(क्र.अग्नि/२/कावि/३८३/२०१८ दि.०६/०४/२०१८ विषय क्र.८ चे लगत)

प्रपत्र – अ

कनिष्ठ अभियंता – ०१ पद (एकाकी पद प्रवर्ग नाही) एकवट वेतन र.रु २०,०००/-

| क्र. | प्रथम निवड उमेदवार | संवर्ग |
|---|---|---|
| १ | श्री. पवार जयदिप हरिश्चंद्र | एकाकी पदास संवर्ग नाही |

पंप मेकॅनिक – ०२ पदे (अनु.जाती. – ०१, खुला -०१) एकवट वेतन र.रु १५,०००/-

| क्र. | प्रथम निवड उमेदवार | संवर्ग |
|---|---|---|
| १ | श्री. कांबळे मनिष रमेश | खुला |
| २ | श्री. सपकाळ ज्ञानेश्वर भागोजी | संवर्ग नाही |

मोटर मेकॅनिक – ०३ पदे (अनु. जाती. – ०१, खुला – ०२) एकवट वेतन र.रु १५,०००/-

| क्र. | प्रथम निवड उमेदवार | संवर्ग |
|---|---|---|
| १ | श्री. सय्यद इनायत शौकत | खुला |
| २ | श्री. बुचडे समिर सतिश | खुला |
| ३ | श्री. माणिकमोते जगदिश मरीबा | अनु. जाती. |

अतिरीक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८